जगभर

नवा भस्मासुर

चन्द्रशेखर पुरन्दरे

लेख लिहिण्याच्या वेळी (नोव्हेंबर तिसरा आठवडा) माली देशाच्या राजधानीतील एका हॉटेलमध्ये 'अल्ला हु अकबर' या घोषणा देत मुस्लीम दहशतवाद्यांनी सुमारे दीडशेवर लोक ओलीस ठेवले. ज्यांना कुराणाचा काही भाग माहीत होता, फक्त त्यांना सोडण्यात आले. सुदैवाने माली, अमेरिका व फ्रान्सच्या सैन्याने त्वरित कारवाई करून बरेच ओलीस सोडवले पण दोन दहशतवादी आणि २१ इतर ओलीस दगावलेच.

त्या आधी दोन दिवस एका चिनी व एका नॉर्वेच्या नागरिकाला सिरीया किंवा इराकमध्ये ठार मारण्यात आले.

१३ नोव्हेंबरला पॅरिसमध्ये आतंकवादी हल्ले होवून सुमारे १३० लोक बळी पडले. मुंबईतील नोव्हेंबर २००८ च्या हत्याकांडासारखेच हे हल्लेही अनेक ठिकाणी एकाच वेळी झाले ज्यायोगे जास्तीत जास्त निरपराधी बळी पडावेत आणि प्रसंग धक्कादायक व्हावा.

एक फुटबॉल स्टेडियम, एक रेस्टॉरंट, गाण्याचा एक कार्यक्रम आणखी दोन-तीन ठिकाणे येथे अतिरेक्यांनी गोळीबार केला, आत्मघातकी स्फोट केले. गाण्याच्या कार्यक्रमात बंदिस्त हॉलमध्ये अडकलेल्यांतील ८९ जण बळी पडले तर ३०० हून अधिक जखमी झाले, त्यातील बरेच गंभीर. हा पॅरिसमधला वर्षभरातील दुसरा मोठा हल्ला. पहिला हल्ला शार्ली हेब्दो या व्यंगचित्र नियतकालिकावर जानेवारीत झाला होता.

आदल्याच दिवशी लेबनॉन देशाच्या बैरुत या राजधानीत शिया वस्तीत आत्मघातकी हल्ला होऊन ४३ शिया मुसलमान ठार करण्यात आले.

त्या आधी ३१ ऑक्टोबरला इजिप्तहून रशियाला येणारे एका प्रवासी विमानात बॉम्बस्फोट घडवून २२४ प्रवासी व कर्मचारी ठार मारण्यात आले.

टीव्हीचा एखादा चॅनेल चोवीस तास चालू राहील अशी ही जंत्री आहे. जगाच्या कोणत्याही भागात अशा घटना एका-मागोमाग घडत आहेत.

ही सगळी कृत्ये इस्लामिक स्टेट (स्टेट) किंवा तोच आदर्शवाद मानणाऱ्या अल-कईदा सारख्या त्या आधीच्या अतिरेकी मुस्लीम संघटनांची. *(स्टेटबाबत 'आंदोलन'मध्ये अलीकडे सविस्तर आढावा घेतलेला आहे.)*

पॅरिसवरच्या हल्ल्याचे वैशिष्ट्य असे की आजवर स्टेट त्यांच्या प्रभाव-क्षेत्रात ही क्रूरकर्मे करत असे. फ्रान्समधील हल्ला हा पश्चिमेकडे भौगोलिक विस्तार आहे. ते इतर देशांच्या भूमीवर त्या देशांना आव्हान आहे. यामागोमाग अमेरिकेवर, अगदी वॉशिंग्टन या राजधानीवर हल्ला करण्यात येईल अशी धमकीही देण्यात आली आहे.

या प्रत्येक हल्यामागे ती संघटना काहीतरी तात्कालिक कारण देते. शार्ली हेब्डोवर हल्ला झाला कारण मोहम्मद पैगंबराची चेष्टा त्या नियतकालिकाने केली; रशियाचे विमान पाडले कारण रशियाने सिरियात मुस्लीमविरोधी हस्तक्षेप सुरू केला; शिया पंथीय सुन्नी श्रद्धा मानत नाहीत म्हणून बैरुतमधील हल्ला (स्टेट सुन्नी आहे); फ्रान्स अमेरिकेबरोबर व काही ठिकाणी अमेरिकेहूनही जास्त तीव्रतेने स्टेटच्या प्रभावक्षेत्रात हल्ले करत आहे; वगैरे.

पण खोलवरचे दोन उद्देश दिसतात. स्टेटला सतत नवीन स्वयंसैनिक हवे आहेत. ते बहुतांशी स्थानिक असले (सिरीया, इराक मधील सुन्नी तरुण) तरी सुमारे २०% पाश्चात्य आहेत. असे हल्ले हे या पाश्चात्य तरुणांना आकर्षित करण्याची जाहिरात असते. या तरुण पिढीचा ते ज्या देशात रहातात त्या संस्कृतीविरुद्ध आकस असतो - हे लोक आपल्या धर्माला, आपल्या जीवन-पद्धतीला तुच्छ मानतात, आपल्याला शिक्षण, नोकरी, राहण्याची घरे या संधी मुस्लीम असल्यामुळे नाकारल्या जातात, इत्यादी. या रागाला स्टेट वाट देते. पॅरिसवरील आठ हल्लेखोरातील पाचजण तरी फ्रेंच नागरिक होते.

अशा हल्ल्याचा दुसरा उद्देश असा की त्या देशाचे सरकार, जनता अर्थातच मुस्लीमविरोधी होते. त्यामुळे या तरुणांच्या संतापात भर पडते आणि ते स्टेटला सामील व्हायला उत्सुक होतात.

अशा विद्वेषाला आळा घालणे हे अवघड काम आहे. संशयितांवर पाळत ठेवणे हे धोरण तुर्कस्तानमध्ये थोड्या प्रमाणात यशस्वी झाले. पण अशा एका संशयितावर सतत देखरेख करायला २० ते ६० पोलीस लागतात. या प्रमाणात पोलीस-दल कोठेच उपलब्ध नसते. दुसरा प्रश्न युरोप-अंतर्गत युरोपिअन नागरिकांना एका देशातून दुसऱ्या देशाला सहज जाता येते. आंतरराष्ट्रीय सीमांसारखी कसून तपासणी होत नाही. बाल्कन देशांमध्ये (बल्गेरिया वगैरे) बंदुका, स्फोटके अगदी स्वस्तात मिळतात. ती सीमा-सुरक्षेचा डोळा चुकवून बेल्जियमसारख्या कमी सुरक्षेच्या देशात आणण्यात

येतात व तेथून हल्ला करायचा त्या देशाला आयत्या वेळी नेली जातात. प्रत्येक देशाकडे संशयितांची यादी असली तरी प्रत्येक वेळी इतर देशांना ती माहिती दिली जातेच असे नाही. मुळात प्रश्न फक्त कायदा-सुरक्षेचा नाही, आपल्या श्रद्धा मान्य नसणाऱ्यांना ठार मारण्याचा आपल्याला दैवी अधिकार आहे या विकृत श्रद्धेचा आहे. त्यामुळे हा पेच बिकट झाला आहे.

परिणाम

फ्रान्समध्ये हा एवढ्या मोठ्या प्रमाणावर हल्ला होणे हा पश्चिमेला धक्का आहे. जेथून हल्लेखोर आले - अगदी दुसऱ्या पिढीचे का होईना, त्याच देशातून निर्वासितांचा ओघ लाखांमध्ये सतत चालू आहे. मागील एका लेखात म्हटलेली शक्यता दुर्दैवाने या घटनेत प्रत्यक्षात आलेली दिसते. एक हल्लेखोर ग्रीसमार्गे निर्वासित म्हणून युरोपात आल्याचे उघड झाले. मग सगळे निर्वासित संभाव्य दहशतवादी आहेत हा ग्रह होणे सोपे आहे. हंगेरीने मुस्लीम निर्वासित नकोतच अशी भूमिका घेतली आहे तर या आधीही अमेरिकेतील बऱ्याच राज्यांनी आम्ही सिरीयन निर्वासित स्वीकारणार नाही असे स्पष्ट केले होते; आता तर त्या केंद्र सरकारनेच तसा निर्णय घेतला आहे. वस्तुत: एका निर्वासिताच्या शब्दात - तुम्ही ज्यांच्याविरुद्ध लढत आहात, त्याच लोकांमुळे आम्ही देशोधडीला लागलो आहोत. पण हा सारासार विचार आज होत नाही.

न्यूयॉर्कमध्ये मुसलमानांवर पाळत ठेवण्याची कार्यवाही ११ सप्टेंबर २००१ च्या घटनेनंतर बरीच वर्षे करण्यात आली. २०१४ साली सरकारने कबूल केले की या कार्यवाहीतून काहीही सकारात्मक निष्पन्न झाले नाही. एकाही संभाव्य दहशतवादी योजनेची माहिती मिळाली नाही. म्हणजे, समाज-सुरक्षेच्या दृष्टीने हे धोरण अयशस्वी झाले. उलट, मुस्लीमांचा दुरावा वाढला, त्यांच्या मशिदीतील प्रवचने कृत्रिम वाटावीत अशी होऊ लागली कारण पोलीस एखाद्या वक्तव्याचा गैर-अर्थ लावून कट करण्याचा, फूस लावण्याचा, अफवा पसरवण्याचा आरोप करतील ही भीती. अगदी एखाद्या हॉटेलमध्ये,सार्वजनिक ठिकाणी मुस्लीम दबून व संशयाने वागू लागले; मशिदीत एखादा नवीन माणूस आला तर तो दहशतवादी तर नाही ना अशा भावनेने त्याला सामावून घेणे अवघड झाले, इ. त्यामुळे अशा योजना कितपत यशस्वी होतील हे सांगता येत नाही. पॅरिस हल्ल्यानंतर व सुरुवातीला दिलेल्या मालीच्या घटनेनंतर संयुक्त राष्ट्रसंघाने सर्व राष्ट्रांनी स्टेटविरुद्ध आघाडी उघडावी असा ठराव केला. फ्रान्सने हा ठराव मांडला आणि तो एक-मताने पारित झाला. विशेष म्हणजे एरवी पश्चिमेच्या कोणत्याही प्रस्तावाला विरोध करणाऱ्या रशियानेही पाठिंबा दिला.

हे प्रसंग अचानक वाढण्याचे एक कारण म्हणजे आधीची अल-कईदा व नवे स्टेट यांच्यात कोण किती जणांना, किती क्रूरपणे मारतो यात चुरस आहे. या हिंसाचाराला स्टेटचा पैसा संपेपर्यंत नजीकच्या भविष्यात अंत दिसत नाही. त्याबरोबरच अतिरेक्याची हुतात्मा होण्याची प्रखर प्रेरणा त्याला पारंपारिक सैन्यापेक्षा अतिशय आक्रमक बनवते. सिरीयाच्या काही हजार सैनिकांना हजाराहून कमी जिहादींनी हरवलेले आहे. या प्रश्नाला निराळी व्यूह-रचना आवश्यक दिसते.

आज स्टेट विरुद्ध सगळेच जग आहे. त्याच्या एकत्रित शक्तीने स्टेटचा शारीरिक पाडाव काही आठवड्यात होऊ शकतो. पण त्याने हा भस्मासुर नाश पावेल असे वाटत नाही.

Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com